


# महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर

## आयसीडीएस सेवा

- ✓ लसीकरण ( Immunization)
- ✓ पुरक पोषण आहार (Supplementary Nutrition)
- ✓ आरोग्य तपासणी (Health Checkup)
- ✓ संदर्भ सेवा (Referral Services)
- ✓ पुर्व शालेय औनोपचारिक शिक्षण (Pre-School Non Formal Education)
- ✓ पोषण व आरोग्य विषयक माहिती (Nutrition and Health Information)

## आयसीडीएस उद्दिष्ट

1) बालकांच्या योग्य मानासिक, शारीरिक व सामाजिक विकासासाठी पाया घालणे.
2) सहा वर्षाखालील वयाच्या बालकांच्या पोषण व आरोग्य स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे.
3) मृत्यू, मानसिक असंतुलन, कुपोषण आणि शाळा सोडणाऱ्या बालकांच्या संख्येत घट घडवून आणणे.
4) बाल विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध विभागांमध्ये धोरण निश्चिती आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावी ताळमेळ कायम ठेवणे.
5) योग्य पोषण आहार व आरोग्य शिक्षण याद्वारे बालकांचे सामान्य आरोग्य व पोषणयुक्त आवश्यकतेबाबतची काळजी घेण्यासाठी मातांना सक्षम व योग्य बनविणे.

| बाब | ग्रामीण | आदिवासी | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण प्रकल्प | 6 | 9 | 15 |
| अंगणवाडी | 1073 | 1492 | 2565 |
| मिनी अंगणवाडी | 46 | 96 | 142 |
| एकूण अंगणवाडी | 1119 | 1588 | 2707 |
| 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके | 51159 | 71442 | 122601 |
| गरोदर व स्तनदा माता | 9225 | 12452 | 21677 |
| एकूण लोकसंख्या | 649876 | 779053 | 1428929 |

| | |
|---|---|
| ग्रामीण | भद्रावती, मूल, नागभिड, सावली, सिंदेवाही व वरोरा |
| आदिवासी | बल्लारपूर, ब्रम्हपुरी, चंद्रपूर, चिमूर, गोंडपिपरी, जिवती, कोरपना, पोंभुर्णा व राजुरा |

| अ.क्र. | अंगणवाडी | संख्या | स्वतंत्र इमारत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | स्वतंत्र इमारत नसलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | शौचालय असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | शौचालय नसलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची सोय असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | विद्युत सोय असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | विद्युत सोय नसलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अंगणवाडी | 2565 | 2336 | 229 | 2140 | 425 | 2237 | 328 | 846 | 1719 |
| 2 | मिनी अंगणवाडी | 142 | 56 | 86 | 52 | 90 | 70 | 72 | 9 | 133 |
| एकूण | | 2707 | 2392 | 315 | 2192 | 515 | 2307 | 400 | 855 | 1852 |

| प्रशासकिय व्यवस्थापन | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | बाब | मंजूर | भरलेली | रिक्त पदे |
| 1 | बाल विकास प्रकल्प अधिकारी | 15 | 4 | 11 |
| 2 | सहा. बाल विकास प्रकल्प अधिकारी | 2 | 2 | 0 |
| 3 | पर्यवेक्षिका | 103 | 57 | 46 |
| 4 | अंगणवाडी सेविका | 2565 | 2352 | 213 |
| 5 | अंगणवाडी मदतनिस | 2565 | 2163 | 401 |
| 6 | मिनी अंगणवाडी सेविका | 142 | 132 | 10 |

# 0 ते 5 वर्ष वयोगटातील श्रेणीनिहाय बालकांची स्थिती

| अ. क्र. | वर्षनिहाय | अंगणवाडी | मिनी अंगणवाडी | एकूण | सर्वेक्षित बालक संख्या | वजन घेतलेली बालके |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | 2565 | 119 | 2684 | 106259 | 103648 |
| | | | | | | 97.54 |
| 2 | 2020-21 | 2565 | 119 | 2684 | 104445 | 102792 |
| | | | | | | 98.42 |
| 3 | 2021-22 | 2565 | 142 | 2707 | 102727 | 101753 |
| | | | | | | 99.05 |

| अ. क्र. | वर्षनिहाय | सर्वसाधारण बालके Normal | कमी वजन असलेली बालके MUW | तीव्र कमी वजन असलेली बालके SUW | मध्यम तीव्र कुपोषित बालके MAM | अति तीव्र कुपोषित बालके SAM |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | 90853 | 10670 | 2125 | 555 | 130 |
| | | 87.66 | 10.29 | 2.05 | 0.54 | 0.13 |
| 2 | 2020-21 | 91590 | 9445 | 1757 | 432 | 70 |
| | | 89.10 | 9.19 | 1.71 | 0.42 | 0.07 |
| 3 | 2021-22 | 89970 | 9876 | 1907 | 1054 | 164 |
| | | 88.42 | 9.71 | 1.87 | 1.04 | 0.16 |

# गरोदर स्त्री चा गोदभराई कार्यक्रम







# मुलांचे लसीकरण कार्यक्रम







# अंगणवाडी मदतनीस कोविड लसीकरण कार्यक्रम





# बालकांचे स्क्रिनिंग पडताळणी







# सॅम बालकांचे घरी गृहभेट द्वारा मार्गदर्शन





# कुपोषित बाळा करीता आत्मनिर्भर पोषण कार्यक्रम





# लसीकरण व मातांची आरोग्य तपासणी









# "तरंग सुपोषित महाराष्ट्राचा" उपक्रमाची अंमलबजावणी




कोविड-19 महामारीच्या कालावधीमध्ये महिला व बाल विकास विभागाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील लाभार्थ्यांकरीता आरोग्य व पोषण विषयक माहिती व समुपदेशन डिजिटल स्वरुपात देण्याकरीता **"तरंग सुपोषित महाराष्ट्राचा"** हा उपक्रम सुरु केला आहे. सदर उपक्रम अत्यंत उपयोगी माहिती IVR हेल्पलाईन (हेल्पलाईन क्रमांक-8080809063) व व्हॉटसॲप चॅटबोट (व्हॉटसॲप चॅटबोट - 8080809063) माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.



"तरंग सुपोषित महाराष्ट्राचा" या डिजीटल प्लॅटफॉर्म उपक्रमात खालील प्रकारच्या अत्यंत उपयोगी माध्यमांद्वारे आरोग्य व पोषणसंबंधीत माहिती, ऑडिओ, व्हिडोओ मेसेजेस, माहिती पुस्तिका इत्यादी प्रचार व प्रसार करण्यात आलेला आहे.

1) IVR Helpline Number
2) व्हॉटसअॅप चॅटबोट
3) ब्रॉडकास्ट कॉल
4) एक घास मायेचा
5) आजीबाईचा गुजगोष्टी

0-3 वर्षाच्या बालकाच्या घरी जाऊन तरंग सूपोषित महाराष्ट्र या हेल्पलाईन नंबर वर फोन करून लाभार्थ्यास व्हिडिओ दाखवताना अंगणवाडी सेविका प्रकल्प ब्रम्हपुरी








गरोदर मातेस बेबी केयर किटचे वाटप करताना



जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करताना



अमृत आहार बाबत गृह भेट देताना पर्यवेक्षिका




मौखिक आरोग्य तपासणी व
तंबाखुमुक्ती समुपदेशन केंद्र
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प- ब्रम्हपुरी
जागतीक स्तनपान सप्ताह १ ऑगष्ट ते ७ ऑगष्ट
Latitude: 20.650017
Longitude: 79.89786
Elevation: 295.92±3 m
Accuracy: 1.8 m
Time: 05-08-2021 11:49
Powered by NoteCam


महिला व बाल कल्याण विभाग जि.प. चंद्रपूर
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प- ब्रम्हपुरी
जागतीक स्तनपान सप्ताह १ ऑगष्ट ते ७ ऑगष्ट
स्तनपान हे अमृत पान
जन्म: येता बाळ राजा, आईचे दुध प्रथम पाजा
चिक दुध हे पहिले लसीकरण
सर्वांचा एकच संकल्प स्तनपाना शिवाय नाही विकल्प
सर्कल - सोंद्री
अंगणवाडी केंद्र-पिंपळगांव 5
Latitude: 20.650015
Longitude: 79.897736
Elevation: 279.04±6 m
Accuracy: 3.0 m
Time: 05-08-2021 11:30
Powered by NoteCam

THR पाकिटचे वजन घेताना सेविका व पर्यवेक्षिका







किशोरवयीन मुली, गरोदर माता व स्तनदा माता यांना ॲनिमिया बद्दल मार्गदर्शन करताना
बालविकास प्रकल्प अधिकारी ब्रह्मपुरी



कोरोना काळात पौष्टिक आहाराचे  लाभार्थ्यांच्या घरी जाऊन प्रात्यक्षिक करून दाखवताना सेविका




Suw sam durdhr
संदर्भ सेवा ,RH.तपासणी.





जवरा बोडी पोषण ट्रँकरा प्रशिक्षण




खेडमक्ता पोषण ट्रँकर प्रशिक्षण


चंद्रपुरला रेफर केले.
लाखापुर दुर्धर मुलगी
वचनबद्ध आहेत.


अंगणवाडी केन्द्र कळमगाव
(1)संस्कार ज्ञानेश्वर कुंभारे जन्म ता 29/12/2017
वय 3वर्ष 8 महिने
वजन 11,500कमी वजन
उंची 94 वेशटिंग मॅम.आमायलेज करुन दिले.






नायरा सहाकाटे सँम




रौनक लक्ष्मन गुरनुले वय 1.7
उंची-66 मँम

# VCDC सन 2018-19 करीता

| अ. क्र. | टप्पा / सत्र | Screening Period | सॅम बालकांची संख्या | यापैकी दुर्धर, गंभीर आजारी बालके / VCDC मध्ये दाखल करु न शकलेली बालके | VCDC मध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या | एकूण VCDC Center | सॅम मधून मॅम | सॅम मधून साधारण | मॅम मधून साधारण | एकूण श्रेणीवर्धन | श्रेणीवर्धन न झालेले (सॅम मधून सॅम) | CTC मध्ये दाखल मुलांची संख्या | NRC मध्ये दाखल मुलांची संख्या | बालकां करीता शास्त्रीय आहार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रथम | **जून** 2018 | 461 | 24 | 437 | 311 | 216 | 98 | 17 | 328 (75.05%) | 109 | 11 | 11 | ARF |
| 2 | द्वितीय | **ऑक्टोंबर** 2018 | 258 | 6 | 252 | 211 | 121 | 79 | 226 | 226 (89.68%) | 26 | 2 | 2 | EDNF |
| **एकूण** | | 2018-19 | 719 | 30 | 689 | 522 | 337 | 177 | 243 | 554 (80.41%) | 135 | 13 | 13 | |

# VCDC सन 2019-20 करीता

| अ. क्र. | टप्पा / सत्र | Screening Period | सॅम बालकांची संख्या | यापैकी दुर्धर, गंभीर आजारी बालके / VCDC मध्ये दाखल करु न शकलेली बालके | VCDC मध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या | एकूण VCDC Center | सॅम मधून मॅम | सॅम मधून साधारण | मॅम मधून साधारण | एकूण श्रेणीवर्धन | श्रेणीवर्धन न झालेले (सॅम मधून सॅम) | CTC मध्ये दाखल मुलांची संख्या | NRC मध्ये दाखल मुलांची संख्या | बालकां करीता शास्त्रीय आहार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रथम | **ऑगष्ट** 2019 | 257 | 0 | 257 | 217 | 106 | 74 | 31 | 211 (82.10%) | 46 | - | - | EDNF |
| 2 | द्वितीय | **जानेवारी** 2020 | 197 | 0 | 197 | 197 | 90 | 59 | 8 | 157 (79.69%) | 38 | 1 | 0 | EDNF |
| **एकूण** | | 2019-20 | 454 | 0 | 454 | 414 | 196 | 133 | 39 | 368 (81.06%) | 84 | 1 | 0 | 1 - **Migration** |

# VCDC सन  2020-21 करीता

| अ. क्र. | टप्पा / सत्र | Screening Period | सॅम बालकांची संख्या | यापैकी दुर्धर, गंभीर आजारी बालके / VCDC मध्ये दाखल करु न शकलेली बालके | VCDC मध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या | एकूण VCDC Center | सॅम मधून मॅम | सॅम मधून साधारण | मॅम मधून साधारण | एकूण श्रेणीवर्धन | श्रेणीवर्धन न झालेले (सॅम मधून सॅम) | CTC मध्ये दाखल मुलांची संख्या | NRC मध्ये दाखल मुलांची संख्या | बालकां करीता शास्त्रीय आहार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रथम | **जुलै** 2020 | 92 | 2 | 90 | 81 | 40 | 17 | 4 | 61 (66.30%) | 24 | 0 | 0 | EDNF |
| 2 | द्वितीय | **जानेवारी** 2021 | 156 | 0 | 156 | 134 | 72 | 33 | 8 | 113 (72.43%) | 40 | 2 | 1 | EDNF |
| **एकूण** | | 2020-21 | 248 | 2 | 246 | 215 | 112 | 50 | 12 | 174 (70.73%) | 64 | 2 | 1 | EDNF |

# VCDC सन  2021-22 करीता

| अ. क्र. | टप्पा / सत्र | Screening Period | सॅम बालकांची संख्या | यापैकी दुर्धर, गंभीर आजारी बालके / VCDC मध्ये दाखल करु न शकलेली बालके | VCDC मध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या | एकूण VCDC Center /Home Based | सॅम मधून मॅम | सॅम मधून साधारण | मॅम मधून साधारण | एकूण श्रेणीवर्धन | श्रेणीवर्धन न झालेले (सॅम मधून सॅम) | CTC मध्ये दाखल मुलांची संख्या | NRC मध्ये दाखल मुलांची संख्या | बालकां करीता शास्त्रीय आहार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रथम | **जून** 2021 | 61 | 0 | 61 | 61 | 18 | 15 | 0 | 33 (54.09%) | 28 | 2 | 2 | EDNF |
| 2 | द्वितीय | **Oct** 2021 | 574 | 0 | 574 | 574 | 284 | 226 | 18 | 528 (91.98%) | 46 | 7 | 3 | EDNF |
| **एकूण** | | 2021-22 | 635 | 0 | 635 | 635 | 302 | 241 | 18 | 561 (88.34%) | 74 | 9 | 5 | EDNF |

# भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा 1 व 2 बाबत COVID-19 चे कालावधीपासून

- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, आविवि-2017/प्र.क्र.5/का.8, दि.31 मार्च 2020 मधील मुद्या क्रं.1 नुसार दि.15 मे 2022 पर्यंत अमृत आहार योजनेंतर्गत अंगणवाडी क्षेत्रातील गरोदर स्त्री व स्तनदा माता यांना गरम ताजा आहार महिला आर्थिक विकास महामंडळ किंवा उमेदकडून स्थापित बचत गट/स्वयंपाकी/मध्यवर्ती स्वयंपाकगृह (उपलब्ध असेल तेथे) यांच्यामार्फत तयार करुन लाभार्थ्यांना घरपोच डब्बा पोहोचविण्यात आली आहे. तसेच 7 महिने ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना एक आठवडा पुरेल इतकी अंडी/केळी पोहोच करण्यात आली आहे.

- परंतु मा. आयुक्त, एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रं./एबाविसेयो/का-2/आवपो/2022-23/आपु/1739, दि.5/05/2022 अन्वये दि.16/05/2022 पासून दि.31.03.2020 च्या शासन निर्णयानुसार आहार आटपाचे 1) घरपोच डबा देणे 2) लाभार्थ्यांना 1 महिन्याचे कच्चे धान्य घरपोच देणे व 3) लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा करणे असे एकूण तीन पर्याय बंद करुन अमृत आहार योजनेचे शासन निर्णयानुसार अंगणवाडीत एक वेळचा चौरस आहार (दुपारचे भोजन) सुरु करण्याबाबत योजनेतील सर्व अंगणवाडी केंद्रांना बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत सूचित करण्यात आलेले आहे.

# भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार टप्पा 1 व 2 योजना
## (Amrut Ahar Scheme)

**शासन निर्णय क्रमांक - टप्पा1 - योजनेची सुरुवात माहे 1 डिसेंबर 2015 पासून करण्यात आली.**

**आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.आविवि-2015/प्र.क्र.78/का-8 दि. 18 -नोव्हेंबर 2015**

1) सदर योजना जिल्हयातील एकुण 13 प्रकल्पातील 765 गावांत समाविष्ट असून 964 अंगणवाडी केंद्रामध्ये राबविण्यात येत आहे. **(902** अंगणवाडी + **62 मिनी** अंगणवाडी)
2) सदर योजनेअंतर्गत जिल्हयातील अनुसुचित क्षेत्रातील नोदणी झालेल्या गरोदर स्त्रियांना व प्रसुतीनंतर स्तनदा मातांना सहा महिने एक वेळचा चौरस आहाराचा लाभ देण्यात येतो.
3) योजनेअंतर्गत अंगणवाडी स्तरावर आहार समिती स्थापन करण्यात आलेल्या असून समितीचे बँक खाते उघडण्यात आलेले आहे.
4) सदर योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी प्रती **रुपये 35/-** खर्च
5) अंगणवाडी सेविका व मदतनिस यांना प्रत्येक माह रुपये **500/-** आहार शिजवण्यासाठी मानधन
6) योजनेकरीता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतून उपलब्ध आहे.

**उद्दिष्टे** – आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाणे वाढविणे. कमी वजनाची नवजात बालकांचे प्रमाण कमी करणे. अपुरा आहार व गर्भावस्थेत घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये आवश्यक जागरुकता घडवून आणणे. अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे. गरोदर माता व स्तनदा माता यांना आहारातून उष्मांक व प्रथिनांची उपलब्धता करुन मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणेकरता प्रयत्न करणे.

# भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार टप्पा 1 व 2 योजना
# (Amrut Ahar Scheme)

**शासन निर्णय क्रमांक टप्पा2 - योजनेची सुरुवात माहे 9 ऑगष्ट 2016 या जागतिक आदिवासी दिनापासून करण्यात आली.**

**आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.आविवि-2016/प्र.क्र.83/कार्यासन-8 दि. 05 ऑगष्ट 2016**

1) अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 7 महिने ते 6 वर्षे वयोगटाच्या सर्व बालकांना प्रतिदिन शाकाहारी मुलांना 2 केळी व मांसाहारी मुलांना 1 उकडलेले अंडी आठवडयातून 4 वेळा म्हणजेच 16 दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी भारतरत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा -2 राबविण्यात येते.
2) या योजनेअंतर्गत मांसाहारी मुलांना कोंबडीचे एक उकडलेले अंडे व शाकाहारी मुलांना दोन केळी याप्रमाणे प्रति लाभार्थी **रु. 6/-** या कमाल मर्यादेत खर्च अनुज्ञेय राहील.

**उद्दिष्टे** – आदिवासी क्षेत्रातील बालकांमध्ये अपुऱ्या आहारामुळे पर्यात उष्मांक (Calories) व प्रथिनांची (Protien) कमतरता असल्याने बालकाच्या वाढीवर होणाऱ्या विपरित परिणामाचे प्रमाण कमी करणे. रक्तक्षय, वाढ खुंटलेली मुले (Stunting) याचे प्रमाण कमी करणे. उंचीच्या प्रमाणात कमी वजन असलेली बालके (Wasting), कमी वजन असलेली बालके (UnderWeight) याचे प्रमाण कमी करणे.

## भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना, टप्पा 1 व टप्पा 2

| सन | अनुसुचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र गावांची संख्या | ए.बा.वि.से.यो. प्रकल्पांची संख्या | योजनेत समाविष्ट एकूण अंगणवाडी केंद्र संख्या | योजना टप्पा 1 | | | योजना टप्पा 2 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | योजनेअंतर्गत लाभ देण्यात येत असलेल्या माता | | एकूण माता | या योजनेअंतर्गत 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील एकूण लाभ देण्यात येत असलेले लाभार्थी |
| | | | | गरोदर | स्तनदा | | |
| 2015-16 | 742 | 13 | 865 | 1709 | 1753 | 3462 | 0 |
| 2016-17 | 742 | 13 | 865 | 3248 | 3017 | 6265 | 34708 |
| 2017-18 | 742 | 13 | 865 | 3240 | 2729 | 5969 | 36331 |
| 2018-19 | 765 | 13 | 964 | 3385 | 3103 | 6488 | 34027 |
| 2019-20 | 765 | 13 | 964 | 3152 | 2968 | 6120 | 33877 |
| 2020-21 | 765 | 13 | 964 | 3129 | 3534 | 6663 | 36592 |
| 2021-22 | 765 | 13 | 964 | 3483 | 4185 | 7668 | 36149 |

## भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना, टप्पा 1 व टप्पा 2

### खर्चाचा अहवाल सन 2015-16 ते सन 2021-22

| सन | योजना टप्पा 1 | | योजना टप्पा 2 | |
|---|---|---|---|---|
| | प्राप्त निधी | खर्च निधी | प्राप्त निधी | खर्च निधी |
| 2015-16 | 1.05 कोटी | 1.05 कोटी | - | - |
| 2016-17 | 5.60 कोटी | 5.60 कोटी | 3.20 कोटी | 3.20 कोटी |
| 2017-18 | 6.33 कोटी | 6.33 कोटी | 4.00 कोटी | 4.00 कोटी |
| 2018-19 | 6.20 कोटी | 6.20 कोटी | 4.00 कोटी | 4.00 कोटी |
| 2019-20 | 4.16 कोटी | 4.16 कोटी | 4.00 कोटी | 4.00 कोटी |
| 2020-21 | 8.50 कोटी | 8.50 कोटी | 4.20 कोटी | 4.20 कोटी |
| 2021-22 | 8.50 कोटी | 8.50 कोटी | 4.20 कोटी | 4.20 कोटी |

# नागभिड प्रकल्प



# नागभिड प्रकल्प



# जिवती प्रकल्प





# APJ योजनेअंतर्गत Covid-19 चे कालावधीमधील प्रकल्पस्तरावरील छायाचित्रे





# APJ योजनेअंतर्गत Covid-19 चे कालावधीमधील प्रकल्पस्तरावरील छायाचित्रे





## एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पावसाळयापूर्वी व पावसाळयात घ्यावयाची काळजी

1) पावसाळयामध्ये अतिदुर्गम व आदिवासी क्षेत्रामध्ये व डोंगराळ गावामध्ये / पाडयांमध्ये दळणवळणाचा तुटणारा संपर्क लक्षात घेता आदिवासी क्षेत्रात पावसाळयाच्या दिवसात पुरक पोषण आहारासाठी आवश्यक धान्यादी मालाचा साठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
2) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंअतर्गत ग्रामीण / आदिवासी प्रकल्पातील 3 वर्ष ते 6 वर्ष वयोगटातील लाभार्थींना गरम ताजा आहार न देता त्या ऐवजी THR च्या पर्यायी व्यवस्थेअंतर्गत कच्चे धान्य पुरवठा करण्यात येत आहे. (Old Supply Complete Upto Dt.31 May 2022) ( Dt. 1 June 2022, HCM Supply Start at Anganwadi Center)
3) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंअतर्गत ग्रामीण /आदिवासी प्रकल्पातील 6 महिने ते 3 वर्ष वयोगटातील सर्वसाधारण बालके, 6 महिने ते 6 वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके, गरोदर व स्तनदा माता तसेच SAG योजनेअंतर्गत 11 ते 14 वयोगटातील शालाबाहय किशोरवयीन मुलींना पर्यायी व्यवस्थेअंतर्गत कच्चे धान्य पुरवठा करण्यात येत आहे.
4) याकरीता दर दोन महिण्यांची मागणी 45 दिवस अगोदर महाराष्ट्र राज्य कन्झुमर्स फेडरेशनकडे करण्यात आली आहे.
5) सॅम बालकांसाठी होम बेस V.C.D.C. नियमित सुरु राहतील याबाबत विभागामार्फत दक्षता घेण्यात आली आहे. सद्यस्थितीत जिल्हयातील **एकूण 123 सॅम** बालकांकरीता **VCDC Start** करण्यात आली आहे. याकरीता **EDNF** शास्त्रीय आहार पुरवठा करण्यात आला आहे. याबाबत संबंधित यंत्रणा आरोग्य विभाग व महिला व बाल कल्याण विभाग यांचे समन्वयाने प्रकल्पस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
6) आरोग्य विभागामार्फत अंगणवाडीमधील 100% लाभधारकांचे वेळापत्रकानुसार नियमित लसीकरण करण्याकरीता स्थानिक पातळीवर संयुक्तपणे कार्यवाही करण्यात येत आहे.
7) पावसाळयामध्ये साथीचे रोग जसे ताप, हगवण, कॉलरा, गॅस्ट्रो इत्यादीचे प्रमाण वाढते. अशा परिस्थितीवर तातडीने नियंत्रण करण्यासाठी वेळीच उपाययोजना करण्याबाबत ग्रामीण पातळीवर सूचना देण्यात आल्या आहे
8) मागील तीन वर्षाचे पावसाळयाच्या कालावधीत बालमृत्यू, अतिकुपोषण व साथीचे रोग याबाबतच्या अनिष्ट घटनांचा आढावा घेऊन त्या क्षेत्रांमध्ये प्रतिबंधनात्मक उपाययोजना सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत करण्यात येत आहे.
9) पावसाळयात पिण्याचे पाणी निर्जंतुक व पिण्यास योग्य असे वापरण्यासंबंधाने तसेच पावसाळयात अतिसाराचे प्रमाण विशेष करुन लहान बालकांमध्ये जास्त असल्याकारणाने बालकांची घरी घ्यावयाची काळजी संबंधाने आरोग्य शिक्षण देण्यात यावे.

आदिवासी, ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडयातील लाभार्थ्यांना पावसाळयाच्या कालावधीत देण्यात येणारा आहार पुरवठा हा आरोग्याच्या दृष्टीने योग्य व निर्जंतुक असावा या अनुषगांने खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास जिल्हयातील सर्व गट विकास अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दक्षता घेण्याबाबत सूचित केले आहे.

- ❖ पुरक पोषण आहार हा आरोग्यदायक, सकस, स्वच्छ व निर्जंतुक असावा.
- ❖ पिण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याची तपासणी करुन आरोग्यास हानीकारक नसल्याचा अहवाल प्राप्त करावा.
- ❖ आहार / अन्न, औषधे व टॉनिक हवाबंद झाकुन ठेवावे, ते उघडयावर ठेवु नयेत.
- ❖ शिळे अन्न लाभार्थ्यांना देण्यात येवू नये.
- ❖ पुरविण्यात येणारा आहार / अन्न हे खाणायोग्य असेल याची खात्री करावी.
- ❖ पुरविण्यात येणाऱ्या आहार व पाण्यामुळे लाभार्थ्यांच्या आरोग्यास कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.


Thank You